मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
अल्पसंख्याक विकास व वक्फ
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

## मंत्रीमंडळ निर्णय - उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## अकृषी विद्यापीठे/विधी विद्यापीठे, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्थामधील शिक्षक व शिक्षक समकक्ष कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू.

**मुंबई, दि. ५ मार्च - उच्च शिक्षण विभागाअंतर्गत राज्यातील अकृषी विद्यापीठे/विधी विद्यापीठे व सल्लग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये, शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्था अनुदानित अभिमत विद्यापीठे (गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था पुणे, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे, महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे) मधील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुधारीत शैक्षणिक अर्हता आणि पात्रता लागू करण्याबाबत, आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषी विद्यापीठे व सल्लग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे. यासाठी दि. १ जानेवारी २०१६ ते ३१ जानेवारी २०१९ पर्यंत सुमारे २५८४.४७ ऐवढा वाढीव खर्च येणार असून, त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा (रुपये १२९२.२३ कोटी) व केंद्र शासनाचा ५० टक्के (रुपये १२९२.२३ कोटी) आहे. सदरहू खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या वाढीव सुमारे ८०० कोटी खर्चास मान्यता देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.**